# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

"इंद्रभवन' डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३००१

## सामान्य प्रशासन विभाग

(E-mail - smcgados२@gmail.com)

जा.क्र.सआस/कक्ष - १/आस्था - ३/ १५२ दि. १४/०८/२०२४

संदर्भ :- १) शासन परिपत्रक क्र.सफाई-२०११/प्र.क्र.३२७/विघयो-२, दि.२१ ऑक्टोबर, २०११.

२) शासन निर्णय क्रमांकः- सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३

३) शासन निर्णय क्र.सफाई/२०२४-प्र.क्र.१६/सआक दिनांक ११ मार्च, २०२४.

४) शासन निर्णय क्र.सफाई २०२३/प्र.क्र.४७/सआक दिनांक ०७ ऑगस्ट, २०२३.

५) क्रमांक -न्यायाप्र-२०२३/प्र.क्र.४८/सआस दि.१२ जुलै,२०२४

६) मा.आयुक्त यांची दिनांक ०५/०८/२०२४ ची मान्यता. (E-६७९८२८)

### :- नियुक्ती आदेश -:

उपरोक्त संदर्भ क्र.१ ते ५ संदर्भातील शासन आदेश / निर्देशानुसार मा.आयुक्त यांचे मान्यतेने लाड कमिटी वारसाहक्क अंतर्गत खालील उमेदवारांना **सफाई कामगार** पदी नियुक्ती करणेस मान्यता देण्यात आलेली असून त्यांची सफाई कामगार यापदी सातवा वेतन आयोगानुसार वेतन स्तर एस-१ र.रु.१५०००-४७६०० नुसार (अधिक इतर मान्य भत्ते) यावर प्रथमतः दिनांक 16 / 08 /२०२४ पासून दोन वर्षाच्या परीविक्षा कालावधीकरीता खालील अटी व शर्तीस अनुसरुन त्यांच्या नावासमोर नमुद कार्यालयाकडे नियुक्त करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सेवानिवृत्त / मयत सेवकाचे नाव | सेवानिवृत्त/ मयत सेवकाचे पदनाम | सेवानिवृत्त/ मयत दिनांक | सेवकाचे वारस उमेदवारांचे नाव | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.पोषाल तमय्या कोडीघंटी | सफाई कामगार | ०३/११/२०१० | श्री.भारत पोशल कोडीघंटी | घनकचरा व्यवस्थापन विभाग |
| २ | श्रीमती चन्नम्मा पेत्रस जनपल्ली | सफाई कामगार | २१/१०/२०१९ | श्री.राजु पेत्रस जनपल्ली | घनकचरा व्यवस्थापन विभाग |
| ३ | श्री.पांडूरंग यलय्या कोडीगंटी | सफाई कामगार | १६/१०/२०२१ | श्री.गणेश पांडूरंग कोडीगंटी | घनकचरा व्यवस्थापन विभाग |
| ४ | श्रीमती देवम्मा कोंडय्या येनमुल | सफाई कामगार | ३०/०६/२०२२ | सौ.लक्ष्मी जयनरसिंग येनमुल | घनकचरा व्यवस्थापन विभाग |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | श्रीमती लक्ष्मी यलय्या मंदोल्लू | सफाई कामगार | १३/०९/२०२२ | श्री.परमेश्वर यलय्या मंदोल्लू | घनकचरा व्यवस्थापन विभाग |
| ६ | श्री.मोगलाली सायण्णा तांडूर | सफाई कामगार | १४/१०/२०२२ | सौ.सुनिता मोगलाली तांडूर | घनकचरा व्यवस्थापन विभाग |
| ७ | कै.दिनेश लग्गा बचुवार | सफाई कामगार | २६/११/२०२३ | श्री.मनोज दिनेश बचुवार | घनकचरा व्यवस्थापन विभाग |

**अटी व शर्ती**

१. उपरोक्त उमेदवारांना सातवा वेतन आयोगानुसार वेतनस्तर एस-१ रु.१५००० - ४७६०० नुसार यापदास मान्य असलेले इतर मान्य भत्ते यानुसार वेतन मिळेल.

२. सदर सेवकांनी नोकरीत रुजू झालेपासून एक महिन्याच्या कालावधीत मेडिकल बोर्ड, सोलापूर महानगरपालिका,सोलापूर यांचेकडील शारीरिक स्वास्थ प्रमाणपत्र (फिजीकल फिटनेस सर्टिफिकेट) हजर करणे आवश्यक आहे.

३. आपणास महानगरपालिकेची नोकरी सोडणे झाल्यास आपण दोन महिन्याची पुर्व नोटीस देणे आवश्यक आहे किंवा त्याऐवजी दोन महिन्याचा मुळ पगारा इतकी रक्कम महानगरपालिकेकडे जमा करणे आवश्यक आहे.

४. आपली नेमणूक ही महानगरपालिकेच्या अस्तित्वात असलेले नियम अथवा यापुढे वेळोवेळी अंमलात येणारे नियम, पोटनियम, विनियम, स्थायी आदेश इत्यादी लागू राहतील.

५. आपली सदरची नेमणूक संपुर्णत: हंगामी स्वरूपाची असल्याने, आपणास केव्हाही कोणतेही कारण न देता विना पुर्व नोटीसी शिवाय नियुक्ती पदावरून कमी करण्यात येईल.

६. आपण नेमणूकीच्या ठिकाणी हजर होताना जर अन्य ठिकाणी नोकरीस असाल तर त्या संस्थेचा / कार्यालयाचा राजीनामा स्विकृत केल्याचा पुरावा हजर करणे आवश्यक आहे.

७. आपणाकडून नियुक्ती मिळविताना शैक्षणिक पात्रतेसंबंधी व इतर प्रमाणपत्र तसेच अन्य अभिलेखाबाबत महानगरपालिकेची दिशाभूल केली आहे असे यापुढे केव्हाही निदर्शनास आल्यास आपणास तात्काळ नोकरीतून कमी करण्यात येईल. तसेच तो पर्यंत आपणास देण्यात आलेले सर्व आर्थिक व इतर लाभ आपणाकडून वसूल करण्यात येईल. तसेच फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्यात येईल.

८. आपण सदर नेमणूकीचे नियुक्ती आदेश मिळालेपासून सात दिवसाचे आत कामावर रूजू व्हावे, सदरचे नियुक्ती आदेश मिळूनही आपण सबळ कारणामुळे हजर होऊ शकत नसाल व ती कारणे नियुक्ती प्राधिकारी यांचे समाधान करू शकत नसतील तर आपले नेमणूकीचे आदेश रद्द करणेत येईल.

९. पोलीस खात्याकडून वर्तणूकीचा दाखला एक महिन्याच्या आत सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

१०. पोलीस खात्याकडून देण्यात आलेल्या वर्तणूकीच्या दाखल्यामध्ये भारतीय दंड संहितेनुसार आपल्यावर फौजदारी गुन्हा दाखल असेल तर आपणास शासन सेवेत कायम स्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल.

14.08.2024

(शीतल तेली - उगले, भा.प्र.से.)
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका,सोलापूर

प्रत :
संबंधित उमेदवार

प्रत :

१) घनकचरा व्यवस्थापन विभाग २) मुख्यलेखापाल ३) अंतर्गत लेखापरीक्षक

४) सेवापुस्तक विभाग - सा.प्र.वि ५) स्थळप्रत